MHBI120007472024

**नियमीत दिवाणी दावा क्र.१५५/२०२४ मधील नि.क्र. २९ खालील आदेश**

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी केला आहे.

२. वादी यांचे असे म्हणणे आहे की, वादीने प्रतिवादींचे विरूध्द प्रस्तुतचा दावा दाखल केलेला असून प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.२ हा दि.०५.१०.२०२५ रोजी मयत झालेला आहे. परंतु प्रतिवादी क्र.२ यांनी त्याचे हयातीत दि.१९.०९.२०२५ रोजीचे बक्षीसपत्र क्र.१६३४/२०२५ नुसार त्याचे नावे असणारी स.नं.७/२ मधील वादग्रस्त मिळकत क्षेत्र ०१ हे. – ३९ आर जमिनी पैकी ०० हे. – ६९.५० आर जमीन प्रतिवादी क्र.४ हिस दिलेली असून त्यानुसार फेरफार क्र.१४४८८ महसुल दप्तरी मंजूर झालेला असून तो वादीवर बंधनकारक नाही. सत्य परिस्थीती अभिलेखावर येण्यासाठी प्रस्तुत दाव्यात व निशाणी ५ नुसार दाखल मनाई हुकुमाच्या अर्जातील प्रतिवादी क्र.२ विजयशंकर पि. लक्ष्मीनारायण दुबे, वय ६८ वर्षे, धंदा–शेती, रा.कटघरपुरा धारूर, ता.धारूर, जि.बीड यांचे नाव दाव्यातील प्रतिवादीचे रकान्यातून व मनाई हुकुमाचे अर्जातील प्रतिवादीचे रकान्यातून वगळणे आवश्यक आहे.

३. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ यांनी त्याचे हयातीत दि.१९.०९.२०२५ रोजीचे बक्षीसपत्र क्र.१६३४/२०२५ नुसार त्याचे नावे असणारी स.नं.७/२ मधील वादग्रस्त मिळकत क्षेत्र ०१ हे. – ३९ आर जमिनी पैकी ०० हे. – ६९.५० आर जमीन प्रतिवादी क्र.४ हिस दिलेली आहे व त्यानुसार फेरफार क्र.१४४८८ महसुल दप्तरी मंजूर झालेला आहे जो वादीवर बंधनकारक नाही, हा मजकूर वादीचे दाव्यामध्ये कलम क्र.३ नंतर कलम क्र.३/अ असे नमूद करून दुरूस्ती करणे आवश्यक

आहे. तसेच सदरील मजकूर हा वादीचे निशाणी क्र.५ प्रमाणे दाखल मनाई हुकूमाचे अर्जातील कलम क्र.४ नंतर कलम ४/अ असे नमूद करून दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच वादीचे निशाणी ५ वरील दाखल मनाई हुकूमाचे अर्जातील पान क्र.६ मधील ओळ क्र.२ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ ऐवजी प्रतिवादी क्र.१, ३ व ४ असे नमूद करणे आवश्यक आहे. सदरील दुरूस्ती करण्याबाबत न्यायालयाने वादीस परवानगी दिल्यास प्रतिवादींवर कसल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. याउलट सत्य परिस्थीती न्यायालयासमोर येणार आहे. सबब दावा दुरूस्तीस परवानगी मिळण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

४. सदर अर्जास प्रतिवादी क्र.४ यांनी म्हणणे दाखल केले की, प्रस्तुत दाव्यातील वादीने दिलेला अर्ज टेनेबल नसून दाव्यातील प्रतिवादी क्र.२ नामे विजयशंकर पि. लक्ष्मीनारायण दुबे याचे नाव दाव्यातील प्रतिवादींचे रकान्यातील व मनाई हुकूमाचे अर्जातील प्रतिवादीचे नाव रकान्यातून वगळण्यासाठी जो अर्ज दाखल केला आहे तो आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे तो पूर्णपणे चुकीचा आहे. प्रतिवादी क्र.२ चे नाव दाव्यातून व मनाई अर्जाच्या प्रतिवादीच्या रकान्यातून वगळण्यासाठी वादीला आदेश १ नियम १०(२) प्रमाणे अर्ज देणे गरजेचे होते. तसेच प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर न घेता सदरचा अर्ज दिला आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र.४ यांनी केली आहे.

५. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

६. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत–**

७. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा हा वाटणी करून विभक्त ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ यांनी त्याचे हयातीत दि.१९.०९.२०२५ रोजीचे बक्षीसपत्र क्र.१६३४/२०२५ नुसार त्याचे नावे असणारी स.नं.७/२ मधील वादग्रस्त मिळकत क्षेत्र ०१ हे. – ३९ आर जमिनी पैकी ०० हे. – ६९.५० आर जमीन प्रतिवादी क्र.४ हिस दिलेली आहे व त्यानुसार फेरफार क्र.१४४८८ महसुल दप्तरी मंजूर झालेला आहे जो वादीवर बंधनकारक नाही, हा मजकूर वादीचे दाव्यामध्ये कलम क्र.३ नंतर कलम क्र.३/अ असे नमूद करून दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सदरील मजकूर हा वादीचे निशाणी क्र.५ प्रमाणे दाखल मनाई हुकूमाचे अर्जातील कलम क्र.४ नंतर कलम ४/अ असे नमूद करून दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच वादीचे निशाणी ५ वरील दाखल मनाई हुकूमाचे अर्जातील पान क्र.६ मधील ओळ क्र.२ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ ऐवजी प्रतिवादी क्र.१, ३ व ४ असे नमूद करणे आवश्यक आहे. सबब दावा दुरूस्तीस परवानगी मिळण्याची विनंती वादी यांनी केली आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ हा दि.०५.१०.२०२५ रोजी मयत झाल्याची बाब वादीला माहित असल्यावरून वादीने निशाणी २७ येथे त्याप्रमाणे पुरसिस दाखल केली होती. प्रतिवादी मयत झाल्यावर वादीने त्याचे वारस अभिलेखावर घेणे अपेक्षीत होते. परंतु वादीने प्रतिवादी क्र.२ याच्या बाबतीत पुढील पुर्तता केलेली नाही. त्यामुळे सदरचा दावा प्रतिवादी क्र.२ विरूध्द उपशमीत झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे नाव वगळण्याची मागणी मंजूर करता येणार नाही.

८. वादीने तिच्या अर्ज कलम–४ मध्ये तिला अपेक्षीत कलम ३–अ हा वाढवण्याची विनंती केली आहे. याकरीता वादीने निशाणी ३२ सोबत बक्षीसपत्र क्र.१६३४/२०२५ दाखल केले आहे. त्याप्रमाणे वादीचे कथन योग्य वाटते. त्यामुळे वादीला दाव्यामध्ये कलम ३–अ हा मजकूर समाविष्ट करण्याची परवानगी देणे योग्य होईल. वादीने त्याच्या मनाई अर्जात दुरूस्ती मागितली आहे. परंतु मनाई अर्ज हा प्लीडींग नसल्याने व वादीस तो अर्ज मागे घेवून नवीन अर्ज देता येण्याची मुभा असल्याने मनाई अर्जात मजकूर समाविष्ट करण्याची व मजकूर दुरूस्त करण्याची परवानगी देता येणार नाही. वादी मागते त्याप्रमाणे कलम ३–अ दाव्यात नमूद केल्यास उभय पक्षकारांमध्ये दाव्यांची संख्या मर्यादित राहून सदर दावा गुणदोषा निकाली करणे न्यायोचीत होईल. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी अंशतः होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादीस केवळ दाव्यामध्ये प्रस्तावित कलम ३–अ नमूद करण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ३. | वादीची निशाणी ५ मध्ये दुरूस्ती करण्याची तसेच प्रतिवादी क्र.२ चे नाव वगळण्याची मागणी नामंजूर करण्यात येत आहे. |
| ४. | वादीने दाव्यात योग्य ती दुरूस्ती मुदतीत करून त्याची प्रत न्यायालयास व प्रतिवादीस द्यावी. |

NILESH MALAKAPPA WALI
Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2026.04.22 16:29:47 +0530

स्थळ-धारुर
दिनांक-२२.०४.२०२६

(एन.एम.वाली )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
धारुर

## :: **Certificate of Stenographer** ::

" I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order. "

Sd/-
(Amol D. Mule )
Stenographer (Grade – 3)
C.J.J.D. & J.M.F.C. Court, Dharur